RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १०, अंक ६] गुरुवार, जानेवारी ११, २०२४/पौष २१, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ६

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ जानेवारी २०२४.

### अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक एलक्यूएन-२०२२/प्र.क्र.८२/अ-२.— भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १०९ च्या पोट-कलम (१) आणि (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, "भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४" यामध्ये सुधारणा करण्याचे महाराष्ट्र शासनाने योजिले आहे. त्या नियमांचा पुढील मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम-११२ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आले आहेत :—

**१.** या नियमांना, "भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) (सुधारणा) नियम, २०२३" असे म्हणावे.

**२.** "भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४" च्या नियम-१८ मध्ये—

(१) उप-नियम (३) ऐवजी पुढीलप्रमाणे उप-नियम दाखल करण्यात येईल :—

"(३) द्यावयाची भरपाईची रक्कम ही, दहा कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल व शंभर कोटी रुपयांपेक्षा कमी असेल, तर जिल्हाधिकारी, संबंधित महसुली विभागाच्या विभागीय आयुक्तांची पूर्वमान्यता घेईल आणि त्यानंतरच निवाडा घोषित करील.";

(२) उप-नियम (३), च्या नंतर पुढील उप-नियम दाखल करण्यात येईल :—

"(३ क) द्यावयाची भरपाईची रक्कम ही, शंभर कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल, तर जिल्हाधिकारी, संबंधित महसुली विभागाच्या विभागीय आयुक्तांमार्फत प्रारूप निवाडा पूर्व मान्यतेस्तव राज्य शासनास सादर करील आणि राज्य शासनाची पूर्वमान्यता प्राप्त झाल्यानंतरच जिल्हाधिकारी निवाडा घोषित करील.";

**३.** उक्त नियमांमधील उप-नियम (४) वगळण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुनिल कोठेकर,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated 11th January 2024.

*NOTIFICATION*

Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013.

No. LQN-2022/C.R.82/A-2.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (2) of section 109 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013) in its application to the State of Maharashtra and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014, the same having been previously published as required by section 112 of the said Act, namely :—

1. These rules may be called the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) (Amendment) Rules, 2023.

2. In rule 18 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014,—

(1) for sub-rule *(3)*, the following sub-rule shall be substituted namely :—

"(3) If an amount of compensation to be paid is more than rupees ten crore and less than rupees one hundred crores, then the Collector shall get the previous approval of the Divisional Commissioner of the concerned revenue division and then only declare the Award.";

(2) after sub-rule *(3)*, the following sub-rule shall be added. namely :—

" (3A) If an amount of compensation to be paid is more than rupees one hundred crores, then the Collector shall submit the Draft Award for previous approval of the State Government through Divisional Commissioner of the concerned revenue division, and only after the previous approval of the State Government, the Collector shall declare the Award.";

(3) sub-rule *(4)* shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUNIL KOTHEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.